क्र.मनपा/नसवि/२/ ०६ /२०१३-२०१४
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका.
दिनांक :- ०६ / ११ /२०१३.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महानगरपालिका सभा क्रमांक - ०६ /२०१३-२०१४

महानगरपालिका सर्वसाधारण सभेची नोटीस

मा. ———————————

सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांना

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन "महानगरपालिका सभेचे कामकाज" मधील खंड १ (ह) व (आय) मध्ये केलेल्या तरतूदीनुसार सांगली,मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **शनिवार दि.१६/११/२०१३ रोजी दुपारी ०४.०० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह,सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका मुख्यालय,सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्टांतील विषय विचाराधीन आहेत. तरी, सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

६/११/२०१३.
प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

कार्यपत्रिका

१. मागील सर्वसाधारण सभा दि.१९/१०/२०१३ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
   अ) दु:खवठ्याचे ठराव.
   ब) अभिनंदनाचे ठराव.

३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग पुणे यांनी सन २०१३-१४ सालाची दरसूची दि.०१/०७/२०१३ पासून लागू करणेस मान्यता दिली आहे. त्यानुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामांची अंदाजपत्रके तयार करणेस तसेच, डांबराच्या बेसिक दरामध्ये दर पंधरा दिवसाला बदल होत असल्याने, भारत पेट्रोलियम यांचेकडून प्राप्त होणाऱ्या डांबराच्या बेसिक दराप्रमाणे अंदाजपत्रक तयार करणेस आणि सद्यस्थितीत बाजारात सिमेंट,सळी इत्यादी बाबींच्या बेसिक दरामध्ये बदल होत असल्याने त्यानुसार शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पारित होणाऱ्या आदेश व परिपत्रकानुसार सन २०१३-१४ ची दरसूची लागू करणेस व अंदाजपत्रक तयार करणेस मान्यता मिळणेबाबत **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.२५/१०/२०१३ चे विषयपत्र.**

५. महानगरपालिकेच्या सांगली शहरातील आमराई उद्यान येथे बॉटनिकल गार्डन तयार करणेत आलेले आहे. सदर गार्डन मध्ये देवबाभळीची काटेरी झुडपे, झाडे व इतर वठलेली अशी ४९ झाडे आहेत. तसेच, हिराबाग वॉटर वर्क्स येथील कामगारांच्या निवासस्थानालगत इमारतींच्या कंपौंडच्या भिंती लगत लहान मोठी धोकादायक असणारी पाच झाडे अशी एकूण ५४ झाडेझुडपे काढणे आवश्यक असल्याने, अंदाजपत्रकानुसार र.रु.५९,०००/- मात्र देकार रक्कम निश्चित करुन झाडांचा जागेवर जाहिर लिलाव करणेस तसेच, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९(क) नुसार जाहिर लिलाव नोटीस प्रसिद्ध करणेस येणारे प्रसिद्धीचे खर्चास मान्यता मिळणेबाबत **उपायुक्त (उद्यान विभाग) यांचे दि.०८/१०/२०१३ चे विषयपत्र.**

... २ ...

६. महानगरपालिकेच्या मिरज दवाखाना प्रसुतीगृहाकडील ॲम्ब्युलन्स् नं.एम एच १० ए २५२८ या वाहनाची बॉडी दुरुस्ती करणे र.रु.१,२६,९००/- मात्र खर्च अपेक्षित असून, सन २०१३-१४ चे अर्थसंकल्पामध्ये (०३१) ब प्रसुतीगृहे ॲम्ब्युलन्स् देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये र.रु.१ लाख मात्र मंजूर तरतुद आहे. सदर तरतुदीमधून खर्च वजा जाता र.रु.२२,५३०/- मात्र शिल्लक असून, अपुरी पडणारी र.रु.१,७५,०००/- मात्र ०२९) क - ३ यंत्रशाळा आकस्मिक या लेखाशिर्षामधून वर्ग करणेस महासभेची मान्यता मिळणेकामी स्थायी समिती ठराव क्र.०५ दि.२९/१०/२०१३ अन्वये झाले शिफारशीनुसार मान्यता देणेबाबत **उपायुक्त (कार्यशाळा विभाग) यांचे दि.१९/१०/२०१३ चे विषयपत्र.**

७. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३० मधील तरतुदीनुसार व महानगरपालिकेच्या विशेष समिती मधील तरतुदीनुसार मागासवर्गीय व दलित वस्ती सुधार समिती सदस्यांची संख्या निश्चित करुन, अधिनियमातील कलम ३१-अ नुसार समितीचे गठण करणे.

८. मा.महापौर, यांचे संमत्तीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

२१/१०/१३

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

मा.महापौर, यांचे मान्यतेने वितरीत

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सूचना (पूरवणी) कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०६/२०१३-१४

महापालिका सभा दिनांक १६/११/२०१३ करीता.

शनिवार दि.१६/११/२०१३ रोजी दुपारी ०४.०० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतदादा पाटील सभागृह, मुख्यालय, सांगली येथे होणाऱ्या महापालिका सभेपुढे ठेवण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २"महापालिका सभेचे कामकाज" खंड १(ज) अन्वये खाली नमूद केलेल्या प्रस्तावाच्या सूचना मा.सदस्य यांचेकडून प्राप्त झाल्या आहेत.

१. **मा.श्री.संतोष शिवदास पाटील, यांनी दिलेला प्रस्ताव :-**

सांगली येथील वॉर्ड क्र.१५ मधील विश्रामबाग रेल्वे गेट जवळील विद्याविहार कॉलनी लगत असलेली मुतारी सदर भागातील व मुख्य रत्याजवळ असणारी एकमेव मुतारी असून, सदर मुतारीचा वापर नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात होत आहे. परंतु, सद्यस्थितीत सदरची मुतारी धोकादायक व पडीक बनली असलेने कोणत्याही क्षणी ती पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांच्या जिवितास इजा होणेची शक्यता असलेने व मुतारी ही मुलभूत सुविधा असलेने, सदरची मुतारी तात्काळ पाडून नविन मुतारी बांधणे व नविन मुतारी बांधेपर्यत तात्पुरती सोय म्हणून फायबरची मुतारी सदर ठिकाणी ठेवणेकरीता चर्चा होवून निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

२. **मा.श्री.पुरुषोत्तम उर्फ बाळासाहेब मुरलीधर काकडे, यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महापालिका क्षेत्रातील सांगली सराफ कट्टा, कापडपेठ कॉर्नर येथील महापालिकेची सार्वजनिक मुतारी असून, सदर मुतारी भर बाजार पेठेत रस्त्यावर असून, या मुतारीमुळे रस्त्यावर मलमुत्र येवून दुर्गंधी पसरुन नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झालेला आहे. तसेच, शनिवार आठवडा बाजार व इतर वेळी मुतारी लगत रस्त्यावर लघुशंका करीत असल्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या महिला वर्गास त्रास सहन करावा लागत आहे. सदर मुतारी हलविण्याबाबत नागरीक व व्यापाऱ्यांनी वारंवार तक्रार महापालिकेकडे केलेली आहे. तसेच याबाबत अजूबाजूच्या नागरिकांना व रहिवाश्यांना, व्यापाऱ्यांना त्रास होत असल्याने, त्यांनी सदर मुतारी हलविणेबाबत लेखी निवेदन दिले आहे. त्यांचे मागणी नुसार सदर मुतारी पाडून त्या भागात पांजरपोळ या ठिकाणी मुतारी बसविण्यास मान्यता मिळणेकामी विचारार्थ व निर्णयार्थ आलेला प्रस्ताव.

३. **मा.सौ.प्रार्थना प्रसाद मदभावीकर, यांनी दिलेला प्रस्ताव :-**

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मिरज शहरातील वॉर्ड क्र.११ मध्ये शनिवार पेठ येथील रुंगठा उद्यान ते पाटील हौद रस्त्यावरील गंजीखाना लगत महापालिकेने स्वच्छतागृह बसविलेले आहे. सदर स्वच्छतागृहाचे तेथील नागरिकांना कोणत्याही प्रकारचा उपयोग होत नाही. सदरचा भाग हा बहुतांशी रहिवासी विभाग असलेने व सर्व नागरिकांच्या घरामध्ये स्वत:चे स्वच्छतागृह असलेने या स्वच्छतागृहाचा तेथील नागरिकांना त्रास होत असलेने येथील नागरिकांनी खुपवेळा स्वच्छतागृह बंद करणेसाठी लेखी मागणी व तोंडी मागणी केलेली आहे. म्हणून हे स्वच्छतागृह कायम स्वरुपी बंद करणेत यावे. (पाडणेत यावे) यासाठी चर्चा होवून धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

४. **मा.सौ.शेवंता गोपाळ वाघमारे , यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.१६ मधील संभाजी कॉलनी टिंबर एरिया या ठिकाणी सार्वजनिक मुतारी आहे. या मुतारीचा वापर योग्य त्या पद्धतीने होत नाही. नागरिक या मुतारीचा वापर न करता बाहेरच लघुशंकेस थांबतात. मुतारीच्या जवळच येथील नागरिकांची घरे आहेत. नागरिक मुतारीच्या बाहेरच लघुशंकेस थांबल्यामुळे स्त्रियांना बाहेर पडणे अवघड झालेले आहे. मुतारीजवळ राहणारे नागरिकांना सदर मुतारीचा घाण वास सहन करावा लागतो. त्यामुळे त्यांचे आरोग्यास धोका होण्याची शक्यता आहे. सदर मुतारीच्या पु.प.या दोन्ही बाजूस सार्वजनिक मुतारी आहे. ही मुतारी पाडलेस कोणतेही अडचण निर्माण होणार नाही. सदर मुतारी पाडणेस येथील नागरिकांची मागणी असून, त्यांनी रितसर अर्ज केलेला आहे. तरी ही मुतारी पाडणेसाठी चर्चा होवून निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

५. **मा.श्री.युवराज सतिश बावडेकर, यांनी दिलेला प्रस्ताव :-**

भारत सरकारने नुकतेच राष्ट्रीय फेरीवाला धोरण जाहीर केलेले असून, ते सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रासाठी लागू झाले असल्याचे समजते. राष्ट्रीय फेरीवाला धोरण म्हणजे काय? तसेच, सदर धोरणाची महानगरपालिका क्षेत्रात कश पद्धतीने अंमलबजावणी केली जाणार आहे. या अत्यंत महत्वाच्या विषयावर जनहितासाठी सविस्तर व साधक-बाधक अभ्यासपूर्ण चर्चा होवून निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

... २ ...

६. **मा.संगिता अभिजीत हारगे, यांनी दिलेला प्रस्ताव :-**

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची मिरज शहरातील ऑक्सीडेंटल प्लॅट (कत्तलखाना जवळील) येथील अंदाजे ३० एकर जमीन प्रत्येक तीन वर्षासाठी भाडेतत्वावर जाहिर लिलाव करुन कसण्यासाठी देणेत येत होती. सदर शेतजमीन कसण्यासाठीची मुदत संपलेली आहे. तरी सदर जमिनीचा कसण्यासाठीचा लिलाव काढला गेलेला नाही. सद्या सदरची जमीन ही पडीक पडलेली आहे. त्यामुळे महापालिकेचे आर्थिक उत्पन्न बुडत आहे. सद्या महापालिकेची आर्थिक परिस्थिती खराब झालेली असल्याने, महापालिकेचे आर्थिक उत्पन्नाची गरज आहे सदर जमीन कसण्यासाठी न दिलेने महापालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. तरी सदर जमिन कसण्यासाठी देणेसाठी अद्याप जाहिर लिलाव काढण्यात आलेला नाही. सदरचा विषय महापालिकेच्या आर्थिक हिताशी संबंधीत असलेने निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

७. **मा.श्री.दिग्विजय प्रदिप सुर्यवंशी, यांनी दिलेला प्रस्ताव :-**

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचा विकास आराखडा केंव्हा निश्चित होणार? असा प्रश्न तमाम महापालिका क्षेत्रातील नागरिकांना पडलेला आहे. महापालिकेच्या विकास आराखड्याचे अद्याप मंजूर न झालेने आजही तीनही शहरांचा विकास रखडलेला आहे. मा.महाराष्ट्र शासनाकडे विकास आराखड्याचा प्रस्ताव पाठवून तीन वर्षाहून अधिक कालावधी लोटलेला आहे. याबाबत महापालिका प्रशासनाने कोणते नियोजन केले आहे? त्यांनी कोणत्या प्रकारची कारवाई केली? याची माहिती सभागृहास होणे आवश्यक आहे. सदरचा विषय हा महापालिकेच्या विकासाचा असलेने हा विषय अत्यंत महत्वपूर्ण आहे. या आराखड्यामध्ये गोकुळ नाट्यगृहाच्या जागेवर भाजी मंडई विकसीत करणे, आमराई उद्यानामध्ये टेनिस कोर्ट आणि प्लेग्राऊंड करणे, शहरामध्ये अद्यावत ट्रक टर्मिनस उभारणी करणे, कुपवाड मधील क्रिडांगण तसेच उद्यानाचे आरक्षण, स्विमिंग टँक, दोन हॉटमिक्स प्लॅट, मिरजेमध्ये खुले नाट्यगृह उभारणे. होमिओपॅथी कॉलेज, प्रभाग समिती कार्यालय, शैक्षणिक संकुलाची उभारणी यासारखे अत्यंत शहराच्या विकासच्या दृष्टीने या गोष्टी व सदरचा विकास आराखडा अत्यंत महत्वाचा आहे यावर सविस्तर चर्चा होवून धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

८. **मा.श्री.दिग्विजय प्रदिप सुर्यवंशी, यांनी दिलेला प्रस्ताव :-**

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेकडून महापालिका क्षेत्रामध्ये विविध प्रकारच्या जाहिराती विविध मान्यवर व्यक्तींच्या वाढदिवसाचे अभिनंदन करणारे डिजीटल बोर्ड तसेच, अनेक प्रकारचे होर्डींग, डिजीटल बोर्ड इ.लावणेसाठी परवानगी देण्यात येते. त्याकामी महानगरपालिका प्रशासनाने सन २०१२-१३ या आर्थिक वर्षामध्ये एजन्सी नियुक्त करण्यात आली होती. परंतु सदर एजन्सीची मुदत ही ३१ मार्च २०१३ रोजी संपलेली आहे. सदर एजन्सीस कोणत्याही प्रकारची मुदतवाढ देण्यात आलेली नाही तरी आजरोजी महापालिका क्षेत्रामध्ये विविध प्रकारच्या जाहिराती व अनेक डिजीटल बोर्ड होर्डींग लावलेले दिसत आहेत. सदर बोर्डसाठी वाहतुक नियंत्रण शाखा परवानगी देत नाही तरीही सदरची होर्डींग डिजीटल बोर्ड लावलेचे दिसून येत आहे. महापालिकेने दिलेल्या एजन्सीची मुदत संपलेली असताना देखील महापालिका क्षेत्रामध्ये विविधी होर्डींग डिजीटल बोर्ड लावणेत आलेली आहेत या प्रकारामुळे प्रचंड प्रमाणात संभ्रमाव्यवस्था निर्माण झालेली आहे. या डिजीटल बोर्डना कोण परवानगी देते, डिजीटल बोर्ड होर्डींग लावणेसाठी महापालिकेची परवपनगी घेण्यात येते काय? सदर होर्डींग्ज् व डिजीट बोर्ड वर एजन्सीचा टोकन नंबर नसल्याने, सदरची सर्व होर्डींग्ज् डिजीटल बोर्ड हे बेकायदेशिरपणे लावणेत येत आहेत अशी सर्व सदस्य व नागरिकांना शंका आहे. या दिलेल्या एजन्सीकडून महापालिकस उत्पन्न मिळत होते.परंतु सद्या एजन्सीची मुदत संपल्याने महापालिकेचे आर्थिक उत्पन्न बुडत आहे. ही बाब महापालिकेच्या आर्थिक हिताशी निगडीत आहे. तसेच, या होर्डींग्ज् व डिजीटल बोर्ड मा.महाराष्ट्र शासन,मा.न्यायालय यांचे काय आदेश आहेत याची सभागृहास होणे आवश्यक आहे. याबाबत सविस्तर चर्चा होवून यावर धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

९. **मा.वंदना सचिदानंद कदम, यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महापालिकेच्या हद्दीतील सांगलीवाडी येथील जुना जकात नाका सद्या वापरात नाही. त्या ठिकाणी महापालिकेमार्फत सकाळी हजेरी शेड म्हणून वापर होत आहे. या भागात जुनी ब्रिटीश कालीन पोलीस चौकी असून ती आडवाटी असल्याने त्याचा वापर केला जात नाही. सांगलीवाडी येथील नागरिकांच्या शांतता व सुरक्षिततेसाठी जूना जकात नाक्याचा वापर पोलीस चौकीसाठी व्हावा व जूनी ब्रिटीश कालीन पोलीस चौकी येथे हजेरी शेड घेणेत यावा असा बदल करणेसाठी नागरिकांनी मागणी केली आहे. त्या मागणीनुसार सांगलीवाडी मधील जुना जकात नाका पोलीस चौकीसाठी देणेस व सांगलीवाडी येथील पूला जवळील जुनी ब्रिटीश कालीन पोलीस चौकी हजेरीशेडसाठी घेणेस या अनुषंगिक कार्यवाही करणेस मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ व विचारार्थ आलेला प्रस्ताव.

१०. मा.श्री.विष्णू आण्णासाहेब माने, यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये विविध प्रकारची इमारती,अपार्टमेंट,मॉल्स्ची बांधकामे होत आहेत त्या बांधकामांना आपल्या महापालिका प्रशासनाकडून बांधकाम परवानगी व बांधकाम परिपुर्ती प्रमाणपत्र देण्यात येते. सदरची कामगिरी ही महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण २५७ ते २६३ या कलमान्वये देणेत येते. अधिनियमात स्पष्ट केलेप्रमाणे अशा प्रकारचे बांधकाम परवाना देते वेळी व बांधकाम परिपुर्ती प्रमाणपत्र देतेवेळी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी प्रत्यक्ष जागेवर जावून पहाणी करुनच अशा प्रकारची परवानगी,प्रमाणपत्रे देणेची असतात. महापालिकेतील संबंधित अधिकारी व कर्मचारी हे प्रत्यक्ष जागेची पहाणी न करताच अशा प्रकारची प्रमाणपत्रे व परवानगी देत आहेत. त्यामुळे महापालिका क्षेत्रातील इमारती अपार्टमेंट,मॉल्स्ची पार्किंग मध्ये अनेक प्रकारचे व्यवसाय सुरु असलेचे दिसून येत आहे. सदरचे व्यवसाय हे कोणतीही परवानगी न घेता सुरु आहेत. याबाबत वृत्तपत्रामध्ये विविध प्रकारच्या बातम्या प्रसिद्ध होत असून, अद्याप महापालिका प्रशासनाने हार्डशिप धोरण स्विकारलेले नाही. त्याची अंमलबजावणी न केलेने महापालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. सद्या महापालिकेची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची असलेने महापालिका उत्पन्न वाढीसाठी या हार्डशिप धोरणाचा उपयोग होणार आहे. या हार्डशिप धोरणाबाबत महापालिका प्रशासनाने कोणती कार्यवाही केली याकामी आलेला प्रस्ताव.

११. मा.श्री.संतोष शिवदास पाटील, यांनी दिलेला प्रस्ताव :-

दि.२०/१०/२०१३ रोजी महासभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार अनुकंपा तत्वावरील कर्मचाऱ्यांना तातडीने न्याय मिळणेकरीता सभागृहात चर्चा झाली असता, मा.महापौर यांनी समिती नेमून समितीच्या शिफारशीनुसार अनुकंपा तत्वावरील प्रकरणे निकालात काढणेचा निर्णय घेतला होता. सदर निर्णयानुसार समिती गठीत करणेकामी व समिती सदस्यांच्या नियुक्त्या करणेबाबत चर्चा होवून निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

१२. मा.सौ.पद्मिनी दिगंबर जाधव, यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज येथील ड्रेनेज योजनेमुळे महापालिका कर्जबाजारी होवून मालमत्ता कर व इतर करामध्ये वाढ होणार असल्याने, मोठ्या प्रमाणात अडचणी येणार आहेत. योजनाही अपुरी राहून बंद पडणार आहे. त्यामुळे शासनाच्या पैशाचा गैरवापर व भष्ट्राचार होणार आहे. यामूळे सद्याची योजना रद्द करणेसाठी सविस्तर चर्चा होवून निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

१३. मा.श्री.धनपाल तात्या खोत, यांनी दिलेला प्रस्ताव :-

१. महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडील शहरातील स्वच्छतेचा व साफसफाईचा बोजवारा उडलेला आहे. तसेच, वर्तमान पत्रामध्ये वेळोवेळी प्रसिद्ध होत आहे. त्यामुळे प्रशासन अपयशी ठरले आहे. त्याबाबत काय धोरण आहे? याबाबत विचार विनीमय करणे अत्यंत गरजेचे आहे.
२. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेंतर्गत घरकुल योजना कोणत्या स्थितीत आहे. मक्तेदार करत नाहीत. त्यामुळे सदरची योजना प्रलंबित आहे. सदरच्या निधीबाबत चर्चाविनीमय करणे व घरकुल योजनेबाबत धोरण ठरविणे.
३. महापालिका क्षेत्रात कुत्रे,शेळया,मेंढ्या,डुकरे यांची जागोजागी संख्या तसेच वर्दळ मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. प्रशासन याबाबत कोणतीच कारवाई करीत नाही. कुत्रे धरली जातात व ती सोडल्यानंतर परत शहरामध्ये प्रवेश करतात. शेळया मेंढ्या इतरत्र फिरत आहे. तसेच शेळया मेंढ्या या रस्ता अस्च्छता करुन आरोग्यास धोका निर्माण करीत आहे. तसेच डुकराची पिले दिवसेनदिवस वाढत आहे. त्याबद्दल आरोग्य विभागाकडील काय धोरण आहे? याबाबत चर्चा विनीमय करणे अत्यंत गरजेचे आहे. याकामी आलेला प्रस्ताव.

१४.मा.श्री.विष्णू आण्णासाहेब माने, यांनी दिलेला प्रस्ताव :-

मा.शासनाच्या धोरणानुसार गौण खनीजांचे (वाळू,दगड,मुरुम,माती) उत्तखननास स्थगिती आहे. याचा परिणाम सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्राच्या सर्वांगीण विकासावर पडत आहे. गौण खनिजांची निविदा न निघालेने उपलब्ध होणे अडचणीचे असलेने, महापालिका क्षेत्रातील विकासकामे करणारे मक्तेदार यांना प्रत्येक कामासाठी वाळू,दगड,मुरुम माती या घटकांची आवश्यकता आहे. त्यामुळे महापालिकेची कोट्यावधी रुपयांची सर्व विकास कामे गेली दोन वर्षापासून रितसर मंजूर असून सुद्धा त्या कारणास्तव मक्तेदार काम करण्यास तयार नाही. याकामी चर्चा करुन मा.शासनास कळविणेकामी आलेला प्रस्ताव.

१५. मा.श्री.सुनील दत्तात्रय कलगुटगी, यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने सांगली शहरातील बालहनुमान कॉलनी भाग १ येथे केंद्र शासन व राज्यशासन यांचेवतीने झोपडपट्टी पुर्नवसन योजना कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. सदर योजनेचे काम अतिशय मंदगतीने सुरु असून गेली वर्षभर योजनेचे काम संबंधीत मक्तेदाराने बंद ठेवले आहे. सदर योजनेपुर्वी येथील भागातील झोपडपट्टीधारकांचा सर्व्हे करुन त्यांच्या नावाच्या यादी निश्चित करण्यात आली आहेत सदर यादीमधून या भागातील अंदाजे ८ ते १० झोपडीधारकांची नावे समाविष्ठ करण्यात आली आहे. त्यामुळे हे झोपडीधारक उघड्यावर आलेले आहेत. सदरचे झोपडीधारक गेली ३० ते ४० वर्षापासून येथे रहात आहेत. त्यांचेकडे येथील सर्व रहिवासी पुरावे देखील आहेत असे असताना ज्यावेळी या भागाचा सर्व्हे झाला त्यावेळी संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांनी राजकीय दबावास बळी पडून सदर झोपडीधारकांची नावे यादीतून वगळली आहेत. वेळोवेळी संबधीत झोपडीधारकांनी याचा पाठपुरावा केला असता त्यास महापालिका प्रशासनाने दाद दिली नाही. यामुळे सदर झोपडीधारकांवर अन्याय झालेला आहे. तरी सदर उर्वरित झोपडीधारकांचे बाबतीत महापालिका प्रशासनाने काय कारवाई केली व सदर योजनेबाबत प्रशासनाचे काय धोरण आहे व या योजनेतील उर्वरित झोपडीधारकांचा सहानुभूतीपुर्वक विचार करुन धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

१६. मा.श्री.सुनील दत्तात्रय कलगुटगी, यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील सांगली शहरातील नविन रेल्वे स्टेशन ते काँग्रेसभवन व टिंबर एरिया ते मार्केट यार्ड या क्रॉस रस्त्यावरील चौकामध्ये आमचे संस्था सर्वोदय मागासवर्गीय गृहनिर्माण सोसा.मर्या.सांगली व सांगली जिल्हा समस्त वडर समाज यांचेवतीने वरील उल्लेखित चौक स्वखर्चाने सुशोभित करुन त्याची देखभाल दुरुस्ती पुढील वीस वर्षाकरीता करु इच्छितो. सदर सुशोभिकरण कामासाठी पाणी,वीजखर्च व इतर विविध प्रकारचे कर जे वेळोवेळी येणार आहेत ते मनपाने माफ करणेत यावेत. तसेच सदर कामांसाठी मनपाने आवश्यक नाहरकत दाखल विकसनकर्त्याला दिल्यास विकसनकर्ते वरील उल्लेखित हे वडर मजूर शिल्प चौक या नावाने चौकाचे सुशोभिकरण करतील. तरी वरील आमची मागणी आपलेकडून मान्य व्हावी व सदर चौक सुशोभिकरण करणेसाठी मनपाचा नाहरकत दाखला व त्या संबंधीत असणारी सर्व कागदपत्रे संबंधीत संस्थेस दिल्यास वरील नमुद चौक सुशोभित होवून शहराचे सौंदर्यामध्ये वाढच होणार आहे. तरी सदरचा विषय हा महापालिका क्षेत्रातील शहराच्या सौंदर्याचे दृष्टीने महत्वाचा असलेने सदरचा प्रस्तावावर सविस्तर चर्चा करुन धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

१७. मा.सौ.संगिता विठ्ठल खोत, यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र. २५ मध्ये खालील रस्त्यांना नामकरण नसल्याने आणि त्यांना पत्रव्यवहार व इतर कामांसाठी तेथील नागरीकांना पत्ता देणेस अडचणीचे होत आहे. यासाठी तेथील नागरीकांच्या नामकरण करणेसाठी मागणी होत आहे. तरी सदर रस्त्यांना नंबर बोर्ड लावणे गरजेचे आहे. यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील १(ज) अन्वये प्रस्ताव निर्णयासाठी घेणेस विनंती आहे.

१. ख्वॉजानगर येथील १० रस्त्यांना अनुक्रमे रस्ता नं.१ ते रस्ता नं.१० असे रस्ता नंबर बोर्ड लावणे.
२. त्रिभुवन सोसायटी येथील रस्त्यांना अनुक्रमे रस्ता नं.१ ते रस्ता नं.४ असे रस्ता नंबर बोर्ड लावणे.
३. गंगानगर येथील रस्त्यांना नंबर बोर्ड लावणे.
४. शांतीनगर येथील रस्त्यांना नंबर बोर्ड लावणे.
५. संघर्ष कॉलनी व जयहिंद कॉलनी येथील रस्त्यांना नंबर बोर्ड लावणे.
६. जनवाडे मळा चौगुले प्लॉट येथील रस्त्यांना नंबर बोर्ड लावणे.

महापालिका सचिव कार्यालय,
महापालिका मुख्यालय, सांगली.
दिनांक : १२/११/२०१३.

महापालिका सचिव,
सांगली,मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १६/११/२०१३

ठराव क्रमांक :- २०७

विषय क्रमांक :- ०१

मागील म्हणजे महासभा दिनांक १९/१०/२०१३ चे कार्यवृत्तातील महासभा ठराव क्र.१८३ ते ठराव क्र.२०६ हे सभागृहामध्ये वाचणेत आले. सभेमध्ये उपस्थित सदस्यांनी महासभा ठराव क्र.२०३ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील फेरीवाला व्यवसायांचे (विनियमन) उपविधी २०१३ चे मसुद्याचे प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज खंड १(के) अन्वये महासभेने ऐनवेळच्या विषयात दाखल करुन मान्यता दिलेली होती. तथापि, राष्ट्रीय फेरीवाला धोरण याची सर्व सदस्यांना माहिती अवगत असणे या सभेस उचित वाटते. तरी सदरचा महासभा ठराव क्र.२०३ हा कार्यवृत्तामधून व्यपगत करणेत यावा आणि सदरचा प्रस्ताव पुढील महासभेच्या विषयपत्रिकेवर रितसर मान्यतेसाठी ठेवणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे. उर्वरित कार्यवृत्त ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ.संगीता खोत
महापौर,

महासभालिपीक

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १६/११/२०१३
२२/११/२०१३

ठराव क्रमांक :- २०८

विषय क्रमांक :- ०२

दु:खवठा ठराव

आपल्या अद्वितीय आवाजाने हिंदी चित्रपट संगीतात ठसा उमटविणारे जेष्ठ गायक मान्ना डे उर्फ मन्नादा यांचे दिर्घ आजाराने वयाच्या ९४ व्या वर्षी निधन झाले. तब्बल पाच दशके जादुई आवाजाने चित्रपट संगीत रसिकांना मंत्रमुग्ध करणारा अवलिया पंचत्वात विलीन झाला.मन्ना डे उर्फ मन्नादा यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांच्या झालेल्या दु:खात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.किशोर दादासाो जामदार

अनुमोदक :- मा.बसवेश्वर सातपुते

ठराव सर्वानुमते मंजुर

संकोचन व बंगलेले

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १६/११/२०१३
२२/११/२०१३

ठराव क्रमांक :- २०९

विषय क्रमांक :- ०२

दु:खवटा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सांगली शहरातील महानगरपालिकेचे माजी नगरसेवक श्री.लक्ष्मण शिवराम नवलाई यांच्या मातोश्री श्रीमती शांताबाई शिवराम नवलाई यांचे नुकतेच वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटूंबियावर दु:खाचे आभाळ कोसळले आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या झालेल्या दु:खात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.दिग्विजय प्रदीप सुर्यवंशी

अनुमोदक :- मा.विष्णू आण्णासाहेब माने

ठराव सर्वानुमते मंजुर

श्रीकांचन ढोबळे
महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६

दिनांक :- १६/११/२०१३
२२/११/२०१३

ठराव क्रमांक :- २१०

विषय क्रमांक :- ०२

दु:खवठा ठराव

कापडपेठ बालाजी मंदिराचे संस्थापक संचालक व कापडपेठेतील प्रतिष्ठित व्यापारी द्वारकाधिश राजारामजी सारडा यांचे दि.०९ नोव्हेंबर २०१३ रोजी वयाच्या ७८ व्या वर्षी निधन झाले. कै.सारडा हे रेडिमेंट गारमेंट चे अध्यक्ष होते. तसेच, त्यांनी राजाराम रंगनाथ सारडा कन्या हायस्कूलची स्थापना केली. त्याचप्रमाणे कर्करोगग्रस्तांना केमो थेरपीची सुविधा होणेसाठी सिद्धीविनायक गणपती कॅन्सर हॉस्पिटल मध्ये आपले वडिलांचे नावे भरीव आर्थिक मदत केली अशा दानशुर,मनमिळावू,विनयशील प्रतिष्ठित व्यापारी आपलेतून निघून गेलेने. व्यापारी क्षेत्रात पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांच्या झालेल्या दु:खात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.संतोष शिवदास पाटील

अनुमोदक :- मा.रोहिणी सत्यजित पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

सौकोचन उ कोंबळे

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १६/११/२०१३
२२/११/२०१३

ठराव क्रमांक :- २९१

विषय क्रमांक :- ०२

दु:खवटा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील सांगली शहरातील युवक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे माजी जिल्हाध्यक्ष मा.सुधीर सिंहासने यांचे वडील कै.सुभाष गौरीहर सिंहासने यांचे नुकतेच आकस्मिक दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनाने त्यांच्या कुटूंबियांवर दु:खाचे आभाळ कोसळले आहे. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांच्या झालेल्या दु:खात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.दिग्विजय प्रदिप सुर्यवंशी

अनुमोदक :- मा.मैनुद्दीन शमशोद्दीन बागवान

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ.कांचन कांबळे
महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १६/११/२०१३
२२/११/२०१३

ठराव क्रमांक :- २१२

विषय क्रमांक :- ०२

दु:खवटा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील मिरज येथील सलीम नायकवडी यांचे नुकतेच दु:खद निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांच्या झालेल्या दु:खात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.शुभांगी आनंदा देवमाने

अनुमोदक :- मा.संगिता अभिजीत हारगे

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ.कांचन कांबळे

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १६/११/२०१३
२२/११/२०१३

ठराव क्रमांक :- २१३

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सांगली क्षेत्रातील छ.शिवाजी मंडई जवळील रस्त्यावरील अतिक्रमण केलेल्या भाजीपाला विक्रेत्यांचे अतिक्रमण काढून रस्ता मोकळा केला या धाडशी निर्णयामुळे सांगलीतील नागरिकांची फार जुन्या मागणीला न्याय मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त श्री.दिपेंद्रसिंह कुशवाह व महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी केली त्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा सर्वांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.हारुणभाई अजीज शिकलगार

अनुमोदक :- मा.संतोष शिवदास पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ.संगीता खोत
महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६

दिनांक :- १६/११/२०१३
२२/११/२०१३

ठराव क्रमांक :- २१४

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

भारताचा महान क्रिकेटपटू श्री.सचिन तेंडूलकर यांच्या दैदिप्यमान क्रिकेट कारकिर्दीस सलाम तसेच त्यांच्या भारतीय क्रिकेट मधील अविस्मरणीय पंचवीस वर्षाच्या योगदानाबद्दल श्री.सचिन तेंडूलकर यांच्या या यशाबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा श्री.सचिन तेंडूलकर यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.स्वरदा श्रीरंग केळकर

अनुमोदक :- मा.अश्विनी हेमंत खंडागळे

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ.कांचन 3 गोखले
महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १६/११/२०१३
२२/११/२०१३

ठराव क्रमांक :- २१५

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

भारत सरकारच्या (युवा कार्यक्रम) नेहरु युवा केंद्राच्या शासकीय जिल्हा सल्लागार समितीवर अशासकीय सदस्य म्हणून पत्रकार श्री.दिपक चव्हाण यांची त्यांच्या सामाजिक क्षेत्रामध्ये केलेल्या उत्कृष्ठ कार्यामुळे निवड करण्यात आली. त्यांच्या या यशाबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा श्री.दिपक चव्हाण यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा. किशोर दादासो जमादार

अनुमोदक :- मा.बसवेश्वर सातपुते

ठराव सर्वानुमते मंजुर
सौ.संगीता खोत
महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १६/११/२०१३
२२/११/२०१३

ठराव क्रमांक :- २१६

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.२५/१०/२०१३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामांची अंदाजपत्रके तयार करणेसाठी महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग,पुणे यांची दरसूची वापरली जाते. सन २०१३-१४ सालाची दरसूची वापरणेस सार्वजनिक बांधकाम विभाग,पूणे यांनी दि.०१/०७/२०१३ पासून वापरणेस मान्यता दिलेली आहे.

डांबरीकरणाच्या कामासाठी वापरणेत येणाऱ्या डांबराच्या दरामध्ये दोन तीन वर्षापासून दर पंधरा दिवसाला बदल होत आहेत. त्यानुसार दर १५ दिवसाला भारत पेट्रोलियम यांचेकडून प्राप्त होणाऱ्या डांबराच्या बेसीक दराप्रमाणे महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक विभागाकडून डांबरी कामाची अंदाजपत्रके तयार करणेत येत असतात. तसेच सद्यस्थितीत बाजारात सिमेंट,सळी इत्यादी बाबींच्या बेसीक दरामध्येही बदल होत असतात. त्यास अनुसरुन शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वेळोवेळी पारीत होणाऱ्या आदेश व परिपत्रकानुसार अंदाजपत्रक तयार करणेस महासभेची मान्यता मिळणेसाठी विषयांकीत प्रस्ताव सादर केला आहे. त्याशी हो सभा सहमती दर्शावित आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील विविध कामांगऱ्यांचो अंदाजपत्रके तयार करणेसाठी महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाची सन २०१३-१४ ची दरसूची वापरणेस तसेच डांबरी कामाची अंदाजपत्रके तयार करताना भारत पेट्रोलियम यांचेकडून प्राप्त होणाऱ्या डांबराच्या बेसीक दराप्रमाणे आणि सिमेंट,सळी इत्यादी बाबींच्या दरामध्ये दरसूचीस अनुसरुन सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पारित होणारे आदेश व परिपत्रके वापरणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

शहर अभियंता

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १६/११/२०१३
२२/११/२०१३

ठराव क्रमांक :- २१७

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (उद्याने विभाग) यांचे दि.०८/१०/२०१३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

तत्कालीन पटवर्धन सरकार यांनी आमराई उद्यान सांगली येथे बॉटनिकल गार्डन तयार केले असून, सदरचे उद्यान सन १९८१ सालापासून महाराष्ट्र शासनाने देखभाल व व्यवस्थेसाठी तत्कालीन सांगली नगरपरिषदेकडे वर्ग करण्यात आले आहे. बॉटनिकल उद्यानामध्ये देवबाभळीची काटेरी झुडपे, झाडे व वठलेली झाडे अशी एकूण ४९ इतकी झाडे आहेत. तसेच सांगली येथील हिराबाग वॉटरवर्क्स येथील कामगारांच्या निवास स्थानालगत एकूण लहान मोठी ५ झाडे असून अशी एकूण ५४ झाडे,झुडपे काढणे आवश्यक आहे. सदरच्या झाडांचा जागेवर जाहीर लिलाव केलेस अंदाजपत्रकानुसार र.रु.५९,०००/- मात्र किंमत होत आहे. त्यानुसार महानगरपालिकेच्या आमराई उद्यानातील ४९ झाडे हिराबाग वॉटर वर्क्स येथील ५ झाडे अशी एकूण ५४ झाडांचा जागेवर जाहीर लिलाव करणेसाठी र.रु.५४,०००/- मात्र देकार रक्कम निश्चित करुन सदर झाडांचा जागेवर जाहीर लिलाव करणेची लिलाव नोटीस स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध देणेस येणारे प्रसिद्धीचे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने श्री.हारुण अजिज शिकलगार यांनी दिलेली उपसूचना दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या हिराबाग वॉटर वर्क्समध्ये ५० वर्षापूर्वी लावलेली १० ते १५ झाडे आहेत. सदर झाडांची वाढ मोठ्या प्रमाणात होवून, सदर झाडांच्या फांद्या कंपौंड लगतच्या परिसरातील उत्तर बाजूकडील एल टाईप रस्त्यावर विस्तारीत होवून, त्याच्या फांद्या नागरिकांच्या घराच्या छतापर्यंत पोहोचल्या आहेत. वादळामुळे सदरच्या फांद्या नागरीकांच्या घरावर पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर ठिकाणची प्रत्यक्ष पाहणी करुन मोठ्या प्रमाणात वाढलेल्या फांद्या तोडण्यात याव्यात. तसेच, राधाकृष्ण एक्स्टेंशन येथील श्री.भरत घोंगडे यांचे घराजवळ मोठे झाड असून, सदरचे झाड तोडणेबाबत अर्ज दिलेला आहे. आणि संजोग कॉलनी येथील बाबगोंडा पाटील यांचे घराजवळील एक झाड असून, सदर दोन्ही झाडांचा विस्तार मोठ्या प्रमाणात झाला असून, नागरिकांच्या जिवितास धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी वरील ठिकाणी समक्षात पहाणी करुन धोकादायक फांद्या तोडण्यास व सदरची धोकादायक झाडेही तोडणेकामी जाहिर लिलाव करणेची नोटीस देवून, योग्यती कार्यवाही प्रशासनाने ठेवणेची आहे त्यास ही सभा मान्यता देत आहे.

बगीचा आवेक्षक

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका,
सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६

दिनांक :- १६/११/२०१३
२२/११/२०१३

ठराव क्रमांक :- २१८

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (कार्यशाळा विभाग) यांचे दि.१९/१०/२०१३ चे विषयपत्र व त्यावरील स्थायी समिती ठराव क्र.०५ दि.२९/१०/२०१३ ची शिफारस या सभेने अवलोकनी घेतली.

महानगरपालिकेच्या मिरज दवाखाना प्रसुतीगृहाकडील ॲम्ब्युलन्स् नं.एम एच १० ए २५२८ या वाहनाची नित्य वापराने बॉडीची दुरुस्ती उद्‌भवली आहे. सदर वाहनाची बॉडी दुरुस्ती करणेसाठी र.रु.१,२६,९००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सन २०१३-२०१४ चे अर्थसंकल्पामध्ये (०३१) ब प्रसुतीगृहे ॲम्ब्युलन्स् देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये र.रु.१ लाख मात्र मंजूर तरतुद असून, सदर तरतुदीमधून खर्च वजा जाता र.रु.२२,५३०/- मात्र शिल्लक आहेत. सदरची रक्कम अपुरी पडणार असल्याने यासाठी अपुरी पडणारी रक्कम ०२९) क - ३ यंत्रशाळा आकस्मिक रु.३,००,०००/- या मंजूर तरतुदीमधून र.रु.१,७५,०००/- मात्र वर्ग करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार तसेच सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ नमुना नं.१० अन्वये आणि स्थायी समिती ठराव क्र.०५ दि.२९/१०/२०१३ अन्वये झाले शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ.कांचन कांबळे
महापौर,

यांत्रिकी अभियंता

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६

दिनांक :- १६/११/२०१३
२२/११/२०१३

ठराव क्रमांक :- २१९

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (नगरसचिव विभाग) यांचे दि.१०/१०/२०१३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रात राहणाऱ्या मागासवर्गीय विशेष घटकातील लोकांच्या कल्याणासाठी तसेच त्यांचे राहणीमान उज्वल करणेसाठी महाराष्ट्र शासनाकडून मागासवर्गीयांसाठी कल्याणकारी योजना वेळोवेळी राबविल्या जात आहेत. यासाठी सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेने मागासवर्गीय व दलित वस्ती सुधार समिती गठीत केली आहे. तसेच मागासवर्गीय वसाहतींचा विकास करणेसाठी महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये एकूण महसुली उत्पन्नाच्या ५% निधी प्रत्येक वर्षी अर्थसंकल्पामध्ये राखून ठेवला जातो. सदर निधीतून अनुसूचित जाती-जमाती,विमुक्त जाती आणि भटक्या जमाती यांचेसाठी कल्याणकारी योजनेवर व सोई सुविधांवर खर्च केला जातो.

महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणुक- २०१३ नुकतीच पार पडलेली आहे. सदर निवडणुकी मध्ये अनुसूचित जाती या प्रवर्गातून एकूण ११ सदस्य निर्वाचित झालेले आहेत. निर्वाचित झालेल्या सदस्या मधून सदस्य संख्या निश्चित करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३० व ३१ नुसार महानगरपालिकेच्या विशेष समित्या मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेसाठी मागासवर्गीय व दलित वस्ती सुधार समितीचे गठण करणे कामी मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आला होता. प्रस्तुत विषयी सभागृहामध्ये सविस्तर झाले चर्चेनुसार सदस्य संख्या ०७ अशी निश्चित करुन मागासवर्गीय व दलित वस्ती सुधार समिती गठीत करणेस ही सभा मान्यता देत आहे.

अ.क्र.	ठरावाच्या बाजूने	अ.क्र.	ठरावाच्या विरोधी
१.	पाटील उमेश विलास	१.	सुर्यवंशी धीरज चंद्रकांत
२.	कांबळे कांचन युवराज	२.	पाटील सुनिता संजय
३.	पेंढारी गुलजार आल्लाबक्ष	३.	सरगर मनगु केरु
४.	पाटील प्रशांत पायगोंडा	४.	मोहिते शेडजी सुबराव
५.	घाडगे विजय वसंत	५.	खोत सुलोचना धनपाल
६.	जगदाळे निर्मला राजेंद्र	६.	खोत धनपाल तात्या
७.	कांबळे सुरेखा कल्लाप्पा	७.	जाधव शांता रघुनाथ
८.	मालगावे बेबी शमशोद्दीन	८.	मदभावीकर प्रार्थना प्रसाद
९.	कांबळे अश्विनी प्रदीप	९.	देवमाने शुभांगी आनंदा
१०.	आवटी सुरेश देवाप्पा	१०.	काजी अल्लाऊद्दीन हयातचाँद
११.	कुलकर्णी अनिल रघुनाथ	११.	औंधकर स्नेहा संजय
१२.	आवटी निरंजन सुरेश	१२.	माने विष्णू आण्णासाहेब
१३.	दुर्वे शिवाजी बाबुराव	१३.	ठोकळे जगन्नाथ बापू

... २ ...

१४.	पाटील रोहिणी सत्यजीत	१४.	शिंदे आशा नितीन
१५.	पाटील संतोष शिवदास	१५.	खंडागळे अश्विनी हेमंत
१६.	वाघमारे शेवंता गोपाळ	१६.	बोळाज शिवराज श्रीशैल
१७.	खोत सुनिता शिवाजी	१७.	कलगुटगी सुनील दत्तात्रय
१८.	पाटील प्रशांत विजयकुमार	१८.	बंडगर प्रियांका सुरेश
१९.	काकडे पुरुषोत्तम उर्फ बाळासाहेब मुरलीधर	१९.	गायकवाड युवराज शिवाजीराव
२०.	भिसे पांडूरंग गंगाराम	२०.	खोत संगिता विठ्ठलराव
२१.	कदम वंदना सच्चिदानंद	२१.	बागवान मैनुद्दीन शमशुद्दीन
२२.	पाटील दिलीप तुकाराम	२२.	बागवान जरीना जमील
२३.	नाईक राजेश विठ्ठल	२३.	हारगे संगिता अभिजीत
२४.	जाधव पद्मिनी दिगंबर	२४.	गवळी राजू लक्ष्मण
२५.	कुरणे अनारकली जमीर	२५.	भोसले शकुंतला दत्तात्रय
२६.	पाटील मृणाल चेतन	२६.	सावंत स्नेहल सचिन
२७.	पाटील प्रदीप जगोंडा	२७.	सावंत महेंद्र रमाकांत
२८.	भंडारे कांचन मस्तान	२८.	कुंडले अंजना रघुनाथ
२९.	नायकवडी हसीना इलियास	२९.	सुर्यवंशी दिग्विजय प्रदीप
३०.	जामदार किशोर दादासो	३०.	केळकर स्वरदा श्रीरंग
३१.	सातपुते बसवेश्वर आनंदराव	३१.	बावडेकर युवराज सतीश
३२.	मेंढे बबीता संजय	३२	गोंधळे बाळासाहेब जगन्नाथ
३३.	मेंढे संजय नायकू		
३४.	नायकवडी आयेशा इद्रिस		
३५.	नायकवडी अतहर इद्रिस		
३६.	कांबळे विवेक आप्पा		
३७.	हुलवान मालन चंद्रकांत		
३८.	पाटील पुष्पलता बाबासाहेब		
३९.	शिकलगार हारुण अजिज		
४०.	चव्हाण शालन मारुती		
४१.	पवार अलका हणमंत		

सदा सभा लिपीक

महापालिका सचिव, सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

:-

अनुमोदक :-

ठराव बहुमताने मंजुर

सौ. चंद्रे व पंचपोळे
महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १६/११/२०१३
२२/११/२०१३

ठराव क्रमांक :- २२०

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.संतोष शिवदास पाटील यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली येथील वॉर्ड क्र.१५ मधील विश्रामबाग रेल्वे गेट जवळील विद्याविहार कॉलनी लगत असलेली मुतारी सदर भागातील व मुख्य रस्त्याजवळ असणारी एकमेव मुतारी असून, सदर मुतारीचा वापर नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात होत आहे. परंतु, सद्यस्थितीत सदरची मुतारी धोकादायक व पडीक बनली असलेने कोणत्याही क्षणी ती पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांच्या जिवितास इजा होणेची शक्यता असलेने व मुतारी ही मुलभूत सुविधा असलेने, सदरची मुतारी तात्काळ पाडून नविन मुतारी बांधणे व नविन मुतारी बांधेपर्यत तात्पुरती सोय म्हणून फायबरची मुतारी सदर ठिकाणी ठेवणेकरीता सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार मान्यतेसाठी अहवाल सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

अतिक्रमण उपायुक्त
महापौर,

वैद्यकीय आरोग्याधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १६/११/२०१३
२२/११/२०१३

ठराव क्रमांक :- २२१

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.पुरुषोत्तम उर्फ बाळासाहेब मुरलीधर काकडे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका क्षेत्रातील सांगली सराफ कट्टा, कापडपेठ कॉर्नर येथील महापालिकेची सार्वजनिक मुतारी असून, सदरची मुतारी भर बाजार पेठेत रस्त्यावर आहे. सदर मुतारीमुळे रस्त्यावर मलमुत्र येवून दुर्गंधी पसरुन नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झालेला आहे. तसेच, शनिवार आठवडा बाजार व इतर वेळी मुतारी लगत रस्त्यावर लघुशंका करीत असल्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या महिला वर्गास त्रास सहन करावा लागत आहे. सदरची मुतारी हलविण्याबाबत महापालिकेकडे नागरीक व व्यापाऱ्यांनी वारंवार तक्रार केलेली आहे. तसेच याबाबत अजूबाजूच्या नागरिकांना व रहिवाश्यांना, व्यापाऱ्यांना त्रास होत असल्याने, त्यांनी सदर मुतारी हलविणेबाबत लेखी निवेदन दिले आहे. त्यानुसार सदरची मुतारी पाडून त्या भागात पांजरपोळ या ठिकाणी मुतारी बसविणेकामी महासभेमध्ये झाले चर्चेनुसार मान्यता मिळणेकामी अहवाल सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

आयुक्त तथा प्रशासक
महापौर,

वैद्यकीय आरोग्याधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १६/११/२०१३
२२/११/२०१३

ठराव क्रमांक :- २२२

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य सौ.प्रार्थना प्रसाद मदभावीकर यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मिरज शहरातील वॉर्ड क्र.११ मध्ये शनिवार पेठ येथील रुंगठा उद्यान ते पाटील हौद रस्त्यावरील गंजीखाना लगत महापालिकेने स्वच्छतागृह बसविलेले आहे. सदर स्वच्छतागृहाचे तेथील नागरिकांना कोणत्याही प्रकारचा उपयोग होत नाही. सदरचा भाग हा बहुतांशी रहिवासी विभाग असलेने व सर्व नागरिकांच्या घरामध्ये स्वत:चे स्वच्छतागृह असलेने या स्वच्छतागृहाचा तेथील नागरिकांना त्रास होत असलेने येथील नागरिकांनी खुपवेळा स्वच्छतागृह बंद करणेसाठी लेखी मागणी व तोंडी मागणी केलेली आहे. म्हणून हे स्वच्छतागृह कायम स्वरुपी बंद करणेत यावे. (पाडणेत यावे) यासाठी महासभेमध्ये झाले चर्चेनुसार मान्यतेसाठी अहवाल सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

सुकांचन उ कांबळे
महापौर,

वैद्यकीय आरोग्याधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १६/११/२०१३
२२/११/२०१३

ठराव क्रमांक :- २२३

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य सौ.शेवंता गोपाळ वाघमारे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.१६ मधील संभाजी कॉलनी टिंबर एरिया या ठिकाणी सार्वजनिक मुतारी आहे. या मुतारीचा वापर योग्य त्या पद्धतीने होत नाही. नागरिक या मुतारीचा वापर न करता बाहेरच लघुशंकेस थांबतात. मुतारीच्या जवळच येथील नागरिकांची घरे आहेत. नागरिक मुतारीच्या बाहेरच लघुशंकेस थांबल्यामुळे स्त्रियांना बाहेर पडणे अवघड झालेले आहे. मुतारीजवळ राहणारे नागरिकांना सदर मुतारीचा घाण वास सहन करावा लागतो. त्यामुळे त्यांचे आरोग्यास धोका होण्याची शक्यता आहे. सदर मुतारीच्या पु.प.या दोन्ही बाजूस सार्वजनिक मुतारी आहे. ही मुतारी पाडलेस कोणतेही अडचण निर्माण होणार नाही. सदर मुतारी पाडणेस येथील नागरिकांची मागणी असून, त्यांनी रितसर अर्ज केलेला आहे. तरी ही मुतारी पाडणेसाठी महासभेमध्ये झाले चर्चेनुसार मान्यतेसाठी अहवाल सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ.कांचन ए कांबळे
महापौर,

वैद्यकीय आरोग्याधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६

दिनांक :- १६/११/२०१३
२२/११/२०१३

ठराव क्रमांक :- २२४

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.युवराज सतिश बावडेकर यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

भारत सरकारने नुकतेच राष्ट्रीय फेरीवाला धोरण जाहीर केलेले असून, ते सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रासाठी लागू झाले असल्याचे समजते. राष्ट्रीय फेरीवाला धोरण म्हणजे काय? तसेच, सदर धोरणाची महानगरपालिका क्षेत्रात कशा पद्धतीने अंमलबजावणी केली जाणार आहे. या अत्यंत महत्वाच्या विषयावर जनहितासाठी सविस्तर व साधक-बाधक अभ्यासपूर्ण चर्चा होवून निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव सादर करणेत आला होता. सभेमध्ये सदर प्रस्तावावर साधक-बाधक चर्चा झाली. राष्ट्रीय फेरीवाला धोरण अंलबजावणी करणेकामी दि.१९/१०/२०१३ चे महासभेने राष्ट्रीय फेरीवाला धोरण उपविधीस ऐनवेळच्या विषयामध्ये मान्यता दिलेली आहे. तथापि, सदरचा प्रस्ताव आगामी महासभेच्या विषयपत्रिकेवर रितसर मान्यतेसाठी ठेवणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

सर्वसाधारण सभा
महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक
क्षेत्रकचेरी अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६

दिनांक :- १६/११/२०१३
२२/११/२०१३
२८/११/२०१३

ठराव क्रमांक :- २२५

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य सौ.संगिता अभिजीत हारगे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची मिरज शहरातील ऑक्सीडेंटल प्लॅट (कत्तलखाना जवळील) येथील अंदाजे ३० एकर जमीन प्रत्येक तीन वर्षासाठी भाडेतत्वावर जाहिर लिलाव करुन कसण्यासाठी देणेत येत होती. सदर शेतजमीन कसण्यासाठीची मुदत संपलेली आहे. तरी सदर जमिनीचा कसण्यासाठीचा लिलाव काढला गेलेला नाही. सद्या सदरची जमीन ही पडीक पडलेली आहे. त्यामुळे महापालिकेचे आर्थिक उत्पन्न बुडत आहे. सद्या महापालिकेची आर्थिक परिस्थिती खराब झालेली असल्याने, महापालिकेचे आर्थिक उत्पन्नाची गरज आहे सदर जमीन कसण्यासाठी न दिलेने महापालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. तरी सदर जमिन कसण्यासाठी देणेसाठी अद्याप जाहिर लिलाव काढण्यात आलेला नाही. महासभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार मिरज शहरातील ऑक्सीडेंटल प्लॅट (कत्तलखाना जवळील) येथील अंदाजे ३० एकर जमीन कसणेसाठी देणेकामी जाहिर लिलाव काढणेकामी मान्यतेसाठी प्रशासनाने अलहिदा अहवाल सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ कांचन कांबळे
महापौर,

जलनिःस्सारण अभियंता
(मिरज)

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६

दिनांक :- १६/११/२०१३
२२/११/२०१३
२८/११/२०१३

ठराव क्रमांक :- २२६

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.दिग्विजय प्रदिप सुर्यवंशी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचा विकास आराखडा केंव्हा निश्चित होणार? असा प्रश्न तमाम महापालिका क्षेत्रातील नागरिकांना पडलेला आहे. महापालिकेच्या विकास आराखड्याचे अद्याप मंजूर न झालेने आजही तीनही शहरांचा विकास रखडलेला आहे. मा.महाराष्ट्र शासनाकडे विकास आराखड्याचा प्रस्ताव पाठवून तीन वर्षाहून अधिक कालावधी लोटलेला आहे. याबाबत महापालिका प्रशासनाने कोणते नियोजन केले आहे? त्यांनी कोणत्या प्रकारची कारवाई केली? याची माहिती सभागृहास होणे आवश्यक आहे. सदरचा विषय हा महापालिकेच्या विकासाचा असलेने हा विषय अत्यंत महत्वपूर्ण आहे. या आराखड्यामध्ये गोकुळ नाट्यगृहाच्या जागेवर भाजी मंडई विकसीत करणे, आमराई उद्यानामध्ये टेनिस कोर्ट आणि प्लेग्राऊंड करणे, शहरामध्ये अद्यावत ट्रक टर्मिनस उभारणी करणे, कुपवाड मधील क्रिडांगण तसेच उद्यानाचे आरक्षण, स्विमिंग टँक, दोन हॉर्टीमक्स प्लॅट, मिरजेमध्ये खुले नाट्यगृह उभारणी, होमिओपॅथी कॉलेज, प्रभाग समिती कार्यालय, शैक्षणिक संकुलाची उभारणी यासारखे अत्यंत शहराच्या विकासच्या दृष्टीने या गोष्टी व सदरचा विकास आराखडा अत्यंत महत्वाचा आहे. महानगरपालिकेच्या विकास आराखड्यास शासनाची सत्वर मान्यता मिळणेकामी प्रशासनाने योग्यती कार्यवाही ठेवावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ.स्वाती शिंदे
महापौर,

सहा.सेचा नगररचनाकार

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६

दिनांक :- १६/११/२०१३
२२/११/२०१३
२८/११/२०१३

ठराव क्रमांक :- २२७

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.दिग्विजय प्रदिप सुर्यवंशी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून हो सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेकडून महापालिका क्षेत्रामध्ये विविध प्रकारच्या जाहिराती विविध मान्यवर व्यक्तींच्या वाढदिवसाचे अभिनंदन करणारे डिजीटल बोर्ड तसेच, अनेक प्रकारचे होर्डींग, डिजीटल बोर्ड इ.लावणेसाठी परवानगी देण्यात येते. त्याकामी महानगरपालिका प्रशासनाने सन २०१२-१३ या आर्थिक वर्षामध्ये एजन्सी नियुक्त करण्यात आली होती. परंतु सदर एजन्सीची मुदत ही ३१ मार्च २०१३ रोजी संपलेली आहे. सदर एजन्सीस कोणत्याही प्रकारची मुदतवाढ देण्यात आलेली नाही तरी आजरोजी महापालिका क्षेत्रामध्ये विविध प्रकारच्या जाहिराती व अनेक डिजीटल बोर्ड होर्डींग लावलेले दिसत आहेत. सदर बोर्डसाठी वाहतुक नियंत्रण शाखा परवानगी देत नाही तरीही सदरची होर्डींग डिजीटल बोर्ड लावलेचे दिसून येत आहे. महापालिकेने दिलेल्या एजन्सीची मुदत संपलेली असताना देखील महापालिका क्षेत्रामध्ये विविधी होर्डींग डिजीटल बोर्ड लावणेत आलेली आहेत या प्रकारामुळे प्रचंड प्रमाणात संभ्रमाव्यस्था निर्माण झालेली आहे. या डिजीटल बोर्डना कोण परवानगी देते, डिजीटल बोर्ड होर्डींग लावणेसाठी महापालिकेची परवानगी घेण्यात येते काय? सदर होर्डींग्ज् व डिजीट बोर्ड वर एजन्सीचा टोकन नंबर नसल्याने, सदरची सर्व होर्डींग्ज् डिजीटल बोर्ड हे बेकायदेशिरपणे लावणेत येत आहेत अशी सर्व सदस्य व नागरिकांना शंका आहे. या दिलेल्या एजन्सीकडून महापालिकेस उत्पन्न मिळत होते.परंतु सद्या एजन्सीची मुदत संपल्याने महापालिकेचे आर्थिक उत्पन्न बुडत आहे. ही बाब महापालिकेच्या आर्थिक हिताशी निगडीत आहे. तसेच, या होर्डींग्ज् व डिजीटल बोर्ड मा.महाराष्ट्र शासन,मा.न्यायालय यांचे काय आदेश आहेत याची माहिती सभागृहास होणे आवश्यक आहे.

प्रस्तुत विषयी सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. चर्चेनुसार महानगरपालिका क्षेत्रात होर्डींग्ज् व डिजीटल बोर्ड उभारणेकामी महानगरपालिका क्षेत्रातील जागा निश्चित करुन एजन्सी नियुक्त करणेकामी सविस्तर अहवाल मान्यतेसाठी सत्वर सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

मालमत्ता
व्यवस्थापक

महापालिका सचिव,
ली मिरज कुपवाड महानगरपालिका.

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ.कोचदे उपमहापौर,

अनुमोदक :-

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६

दिनांक :- १६/११/२०१३
२२/११/२०१३
२८/११/२०१३

ठराव क्रमांक :- २२८

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य सौ.वंदना सच्चिदानंद कदम यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिकेच्या हद्दीतील सांगलीवाडी येथील जुना जकात नाका सद्या वापरात नाही. त्या ठिकाणी महापालिकेमार्फत सकाळी हजेरी शेड म्हणून वापर होत आहे. या भागात जुनी ब्रिटीश कालीन पोलीस चौकी असून ती आडवाटी असल्याने त्याचा वापर केला जात नाही. सांगलीवाडी येथील नागरिकांच्या शांतता व सुरक्षिततेसाठी जूना जकात नाक्याचा वापर पोलीस चौकीसाठी व्हावा व जूनी ब्रिटीश कालीन पोलीस चौकी येथे हजेरी शेड घेणेत यावा असा बदल करणेसाठी नागरिकांनी मागणी केली आहे. त्या मागणीनुसार सांगलीवाडी मधील जुना जकात नाका पोलीस चौकीसाठी देणेस व सांगलीवाडी येथील पूला जवळील जुनी ब्रिटीश कालीन पोलीस चौकी हजेरीशेडसाठी घेणेस या अनुषंगिक कार्यवाही करणेस मान्यता मिळणेकामी आलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली.

महानगरपालिका क्षेत्रातील शास्त्री चौक ते मारुती रोड या रस्त्याचे रुंदीकरण नुकतेच झाले आहे. सदर रस्ता रुंदीकरणामध्ये अंकली पोलीस चौकी ही सार्वजनिक रस्त्यावर आहे. तसेच आमराई जवळील जेठाभाई येथील कार्यालयासमोरील पोलीस चौकी सार्वजनिक रस्त्यावरच आहे. त्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होत आहे. पेठभाग कर्नाळ रोड पोलीस चौकी सदरची चौकी तत्कालीन जकात नाक्याच्या शेजारी शेडमध्ये होती. सदरचा जकात नाका हा मसोबा देवळाजवळ नव्याने बसविणेत आलेनंतर जुन्या कर्नाळ रोड जकात नाक्याची जागा कर्नाळ रोड पोलीस चौकीस वापरणेस देणेत आली आहे. सदरची चौकी ही रस्त्यावर असल्याने वाहन चालकांना वाहने वळविणेस अडचणीचे होत आहे. सदरच्या चारही पोलीस चौक्या स्थलांतरीत करणेकामी पोलीस कार्यालयाशी संपर्क साधून, योग्यती कार्यवाही विनाविलंब ठेवणेत यावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

शहर अभियंता
मालमत्ता व्यवस्थापक

सूचक :-

महापालिका सचिव,
ली मिरज कुपवाड महानगरपालिका

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ. कांचन 3 कांबळे

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६

दिनांक :- १६/११/२०१३
२२/११/२०१३
२८/११/२०१३

ठराव क्रमांक :- २२९

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये विविध प्रकारची इमारती, अपार्टमेंट, मॉल्स्ची बांधकामे होत आहेत त्या बांधकामांना आपल्या महापालिका प्रशासनाकडून बांधकाम परवानगी व बांधकाम परिपुर्ती प्रमाणपत्र देण्यात येते. सदरची कामगिरी ही महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण २५७ ते २६३ या कलमान्वये देणेत येते. अधिनियमात स्पष्ट केलेप्रमाणे अशा प्रकारचे बांधकाम परवाना देते वेळी व बांधकाम परिपुर्ती प्रमाणपत्र देतेवेळी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी प्रत्यक्ष जागेवर जावून पहाणी करुनच अशा प्रकारची परवानगी,प्रमाणपत्रे देणेची असतात. महापालिकेतील संबंधित अधिकारी व कर्मचारी हे प्रत्यक्ष जागेची पहाणी न करताच अशा प्रकारची प्रमाणपत्रे व परवानगी देत आहेत. त्यामुळे महापालिका क्षेत्रातील इमारती अपार्टमेंट,मॉल्स्ची पार्किंग मध्ये अनेक प्रकारचे व्यवसाय सुरु असलेचे दिसून येत आहे. सदरचे व्यवसाय हे कोणतीही परवानगी न घेता सुरु आहेत. याबाबत वृत्तपत्रामध्ये विविध प्रकारच्या बातम्या प्रसिद्ध होत असून, अद्याप महापालिका प्रशासनाने हार्डशिप धोरण स्विकारलेले नाही. त्याची अंमलबजावणी न केलेने महापालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. सद्या महापालिकेची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची असलेने महापालिका उत्पन्न वाढीसाठी या हार्डशिप धोरणाचा उपयोग होणार आहे. या हार्डशिप धोरणाबाबत महापालिका प्रशासनाने कोणती कार्यवाही ठेवली याबाबत महासभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार सदरचा विषय आर्थिक बाबींशी निगडीत असल्याने सविस्तर अहवाल सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

नगररचनाकार

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ.कल्पना ढेगळे

महापौर,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १६/११/२०१३
२२/११/२०१३
२८/११/२०१३

ठराव क्रमांक :- २३०

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.संतोष शिवदास पाटील यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

दि.२०/१०/२०१३ रोजी महासभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार अनुकंपा तत्वावरील कर्मचाऱ्यांना तातडीने न्याय मिळणेकरीता सभागृहात चर्चा झाली असता, मा.महापौर यांनी समिती नेमून समितीच्या शिफारशीनुसार अनुकंपा तत्वावरील प्रकरणे निकालात काढणेचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार अनुकंपा तत्वावरील कर्मचाऱ्यांना सत्वर न्याय मिळणेच्या दृष्टीने मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली खालील समितीचे गठण करणेत येत आहे.

१. मा.महापौर	अध्यक्ष
२. मा.हारुण अजिज शिकलगार	सदस्य
३. मा.संतोष शिवदास पाटील	सदस्य
४. मा.अतहर इद्रिस नायकवडी	सदस्य
५. मा.विष्णू आण्णासाहेब माने	सदस्य

सदर समितीचे सदस्य सचिव म्हणून मा.प्रशासन अधिकारी (आस्थापना) यांनी काम पाहणेचे आहे असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.संतोष पाटील सूचकांच्या उपस्थितीत
महापौर,

प्रशासन अधिकारी
(आस्थापना)

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६

दिनांक :- १६/११/२०१३
२२/११/२०१३
२८/११/२०१३

ठराव क्रमांक :- २३१

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये समा.सदस्य सौ.पद्मिनी दिगंबर जाधव यांनी दिलेला सांगली मिरज येथील ड्रेनेज योजनेमुळे महापालिका कर्जबाजारी होवून मालमत्ता कर व इतर करामध्ये वाढ होणार असल्याने, मोठ्या प्रमाणात अडचणी येणार आहेत. योजनाही अपुरी राहून बंद पडणार आहे. त्यामुळे शासनाच्या पैशाचा गैरवापर व भष्ट्राचार होणार आहे. यामूळे सद्याची योजना रद्द करणेसाठी सविस्तर चर्चा होवून निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज भुयारी गटर योजना टप्पा क्र.२ भाग २ या दोन्ही योजनेची निविदाचौ मुळ किंमत रु.११५.१६ कोटी इतकी होती. सन २०१२-१३ च्या दरसूचीनुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सदर योजनेची किंमत रु.१५९.०४ कोटी इतकी आहे. योजनेच्या आकृतीबंधाप्रमाणे ५०% राज्य शासनाकडून रु.७९.५२ कोटी अनुदानाचे स्वरुपात आणि उर्वरित र.रु.७९.५२ कोटी ५०% महानगरपालिका निधीतून अथवा कर्ज स्वरुपात घ्यावे लागणार आहेत. ठेकेदाराच्या अंतिम देकारानुसार एकूण र.रु.१७४.५० कोटी इतका खर्च आहे. त्यानुसार निविदा स्विकारणेचे झालेस रु.१५.४६ कोटी एवढी संभाव्य भाववाढ इतका अतिरिक्त खर्च महानगरपालिकेस उचलावा लागणार आहे. सांगली मिरज भुयारी गटार योजना टप्पा क्र.२ भाग २ चे निविदा दरास खालील प्रमाणे सहमतीच्या अधीन राहून महासभा ठराव क्र.०१ दि.०६/०४/२०१३ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे...

१) सांगली भूयारी गटार योजना टप्पा क्र.२ भाग २ च्या निविदा दरास निविदा किंमतीच्या ४९.८२% जादा दराने तसेच चालु दरसूचीनुसार (सन २०१२-१३) ९.७२% जादा दरास मान्यता दिली आहे.

२) मिरज भूयारी गटार योजना टप्पा क्र.२ च्या निविदा दरास निविदा किंमतीच्या ५३.६८% जादा दराने तसेच चालु दरसूचीनुसार (सन २०१२-१३) ९.७२% जादा दरास मान्यता दिली आहे.

३) दरसूचीतील फरक मिळणेसाठी सुधारीत योजना शासनास सादर करणेस मान्यता दिली आहे.

४) अंदाजे रु. १२५ कोटी कर्ज उभारणीस मान्यता दिली आहे.

५) चालु व्याजदर व १० वर्षे कर्ज परतफेड कालावधी धरता साधारण दरवर्षी रु.२० कोटीची अतिरिक्त तरतुद कर्ज फेडीसाठी अर्थसंकल्पात करणे व सिंकिंग फंडामध्ये सदर रक्कम वर्ग करुन कर्ज फेड नियमित स्वरुपात करणेसाठी मान्यता दिली आहे.

६) महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा, जलनि:सारण,घरपट्टी व मालमत्ता इत्यादी विभागांचे सेवांचे दर/सेवा शुल्क इत्यादींची आकारणी महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रक क्र.शासन निर्णय क्र.संकिर्ण -२००९/प्र.क्र. २०७/०९/ नवि २०/ मंत्रालय मुंबई दि.२ ऑगस्ट २०१० व महाराष्ट्र शासनाशी दि.०२/०८/२०१० रोजी केलेल्या सामंजस्य कराराप्रमाणे सुधारीत कर आकारणी व इतर प्रशासकीय व आर्थिक सुधारणा करणे, विषयाची प्रक्रिया चालू आर्थिक वर्षापासुन सुरु करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार सभेने मान्यता दिली आहे.

... २ ...

उक्त विषयाच्या अनुषंगाने सभेमध्ये खालील प्रमाणे चर्चा झाली.

महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार दि.०२/०८/२०१० रोजी केलेल्या सामंजस्य कराराप्रमाणे महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा,जलनि:सारण,घरपट्टी व मालमत्ता इत्यादी विभागांचे सेवांचे दर / सेवा शुल्क इत्यादींची आकारणी चालू आर्थिक वर्षापासून लागू करणेस महासभेने मान्यता दिलेली आहे. तसेच, भांडवली मुल्यावर मालमत्ता कर आकारणी करणेत असल्याचे प्रशासनाकडून सभेमध्ये विदित केले आहे. भांडवली मुल्यावर कराची आकारणी केलेस नागरिकांचे वर कराचा नाहक बोजा पडणार आहे. कोणत्याही करामध्ये वाढ न करता सदरची योजना राबविणेत यावी असे या सभेचे स्पष्ट मत आहे.

नगरोत्थान योजना राबविणेसाठी महाराष्ट्र शासनाने सॉफ्टलोन उपलब्ध करुन देणेची हमी दिली होती.आत्ता, महाराष्ट्र शासनाने याकामी कर्ज उपलब्ध करुन देणेची जबाबदारी नाकारली आहे. त्यामुळे सदरची योजना पूर्ण करणेस महाागरपालिकेस मोठ्या प्रमाणात कर्ज उपलब्ध करुन घ्यावे लागणार आहे. योजना पूर्ण करणेचा कालावधी विचारात घेतला असता, मुदतीत योजना पूर्ण होईल याची खात्री देता येत नाही. योजना पूर्ण करणेस दिनावधी लागणार असून, योजनेसाठी उपलब्ध करुन घेतलेले कर्जाची परतफेड व्यवस्थितपणे होईल याची शाश्वती देता येत नाही.

सबब, वरील सर्व वस्तुस्थिती विचारात घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली व मिरज येथील भुयारी गटार योजना गुंठेवारी विस्तारीत भागामध्ये राबविणेत येत आहे. दोन्ही शहराच्या आरोग्याच्या दृष्टीने व सांडपाणी निचरा होणेच्या दृष्टीने तसेच, विद्यमानस्थित गावठाण भागामध्ये सद्या असलेली भुयारी गटार योजनेवरील ताण कमी करणेसाठी सदरची योजना ही अत्यंत महत्वाची आहे. सदरची योजना पूर्ण करणेस कोणत्याही सदस्यांचे दुमत नाही. तथापि, सदरची योजना पूर्ण करणेसाठी आवश्यक असणारा निधी हा केंद्र व महाराष्ट्र शासनाकडून जास्तीत जास्त प्राप्त करुन घेवून, योजना पूर्ण करुन घेणेत यावी त्यासाठी महापालिका क्षेत्रातील नागरिकांचेवर कोणत्याही प्रकारची करवाढ करणेत येवू नये. प्रस्तुत कामी शर्ती-अटी विचारात घेवून तसेच, सर्वकष कायदेशिर बाबींचा अभ्यास करुन फेर निविदा मागविणेत याव्यात. तसेच, ठेकेदाराने करापत्राचा भंग केलेस प्रशासनाचा अभिप्राय घेवूनच निर्णय घ्यावा.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ. कंचन उ. वंगवाळे
महापौर,

कार्य अभियंता
पा.पु.व जल.नि.सारण

आमोदक

सदरचा ठराव मा. आयुक्तांचे यांचे निर्देशनास आणून उचीत कार्यवाही व्हावी.

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.